



दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १८६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१७ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ पूर्वतयारी संदर्भात बैठक



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, मुंबई :** आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ सुरळीत, सुरक्षित व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडावे, या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कामकाज करावे. विधानभवन परिसरात शिस्त आणि सुरक्षेला प्राधान्य देण्यात येऊन गर्दी नियंत्रित व्हावी यादृष्टीने सुरक्षा यंत्रणेने नियोजन करावे, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

विधानभवन, येथे २०२६ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाच्या अनुषंगाने पूर्वतयारीसंदर्भात बैठक सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. अधिवेशन काळात सुव्यवस्था आणि सुरक्षितता याबाबत दक्षता घेण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.

बैठकीत सुरक्षा व्यवस्थेच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाययोजना, वाहनतळ व्यवस्था, अधिवेशन कालावधीतील अनुभवी डॉक्टरांची उपलब्धता, वैद्यकीय सुविधा, उपहारगृहामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा, उपहारगृहातील स्वच्छता व खाद्यपदार्थांची तपासणी, विधानभवन परिसरातील स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, अखंडित पाणीपुरवठा, दूरध्वनी व इंटरनेट सुविधा, रेल्वे आरक्षण तसेच आपत्कालीन व्यवस्था या सर्व विषयांसंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला.


अधिवेशन कालावधीत अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी व कामकाज सुरळीत पार पडावे यासाठी कार्यालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रवेशासाठी पर्यायी प्रवेशद्वाराची व्यवस्था करण्यात आली असून प्रवेश नियंत्रण कडक ठेवावे, वाहनतळ व्यवस्था उचित असावी तसेच सुरक्षा, स्वच्छता व आपत्कालीन सेवा पूर्णतः सज्ज ठेवाव्यात, असे स्पष्ट निर्देश सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

पोलीस विभागाने सुरक्षेच्या दृष्टीने चोख बंदोबस्त ठेवावा, सार्वजनिक आरोग्य विभागाने वैद्यकीय सुविधा उपलब्ध ठेवाव्यात, सार्वजनिक बांधकाम विभागाने सभा मंडप व पूरक कामे तात्काळ पूर्ण करावीत, विद्युत विभागाने अखंडित सेवा सुनिश्चित करावी तसेच उपहारगृह अधिवेशन काळात अधिक वेळ सुरू ठेवून खाद्यपदार्थांची गुणवत्ता तपासावी, असे निर्देशही देण्यात आले. रेल्वे विभागाने दोन्ही सभागृहांच्या सदस्यांच्या प्रवासाची सुविधा अग्रक्रमाने उपलब्ध करून द्यावी. त्याचप्रमाणे वार्तांकनासाठी येणाऱ्या पत्रकारांसाठी मंडप आणि आवश्यक सुविधा सुनिश्चित कराव्यात, असे निर्देश सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.

बैठकीस महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, बृहन्मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबईचे अपर पोलीस आयुक्त डॉ. अभिनव देशमुख, सार्वजनिक आरोग्य विभागाचे उपसचिव दीपक केंद्रे, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबईचे उपसंचालक डॉ. गोविंद चौधरी, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त डीधर डुबेपाटील तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे, सचिव-२ मेघना तळेकर इटकेलवार, सचिव-४ शिवदर्शन साठ्ये व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## आज रिक्षा बंदीचा आदेश स्पष्ट !

### मॉनिटरिंग कमिटीची भूमिका नेमकी काय?




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१६, माथेरान :** माथेरानमध्ये हात रिक्षा बंदीचा प्रश्न केवळ वाहतुकीचा विषय नाही, तर तो संपूर्ण गावाच्या भविष्याशी जोडलेला आहे. Supreme Court of India यांनी हात रिक्षा ही अमानवी प्रथा असल्याचे स्पष्ट करत ती बंद करण्याचे आदेश दिले आहेत. एवढा ऐतिहासिक आणि महत्त्वाचा निर्णय झाल्यानंतरही अंमलबजावणीत होत असलेली दिरंगाई नागरिकांना अस्वस्थ करत आहे. माथेरानमधील शेकडो कुटुंबांचा रोजगार, त्यांचे जीवनमान आणि गावाचा विकास या सर्व गोष्टी या निर्णयावर अवलंबून आहेत. त्यामुळे हा विषय लांबणीवर टाकण्याचा नाही. अशा वेळी मॉनिटरिंग कमिटीची भूमिका अधिक जबाबदारीची ठरते. कमिटीची गरज कोणी नाकारत नाही; पर्यावरण, वाहनसंख्या आणि नियम यांचा अभ्यास होणे आवश्यकच आहे. परंतु जर निर्णय प्रक्रिया विनाकारण विलंबित होत असेल, तर त्या दिरंगाईमागचे कारण स्पष्ट केले पाहिजे.नागरिकांचा साधा प्रश्न आहेही चालढकल नेमकी कशासाठी? जर काही तांत्रिक किंवा कायदेशीर अडचणी असतील, तर त्या पारदर्शकपणे जाहीर कराव्यात. निर्णयासाठी ठरावीक कालमर्यादा द्यावी. चार महिने, पाच महिने किंवा वर्षानुवर्षे लवकरच निर्णय होईल असे सांगणे योग्य नाही. गावाचा भविष्यकाळ अधांतरी ठेवणे ही जबाबदारी टाळण्यासारखी गोष्ट आहे.

जर मॉनिटरिंग कमिटी न्यायालयाच्या आदेशानंतरही ठोस निर्णय घेण्यात अपयशी ठरत असेल, तर त्यांच्या कार्यपद्धतीचा आढावा घेणे आवश्यक आहे. गरज भासल्यास कायदेशीर कारवाई किंवा कमिटीची फेररचना हाही पर्याय प्रशासनाने विचारात घ्यायला हवा. कारण हा केवळ प्रशासकीय विषय नाही; तो नागरिकांच्या सन्मान, रोजगार आणि भविष्याचा प्रश्न आहे.माथेरानसारख्या ऐतिहासिक ठिकाणी घेतला जाणारा हा निर्णय पुढील अनेक वर्षांचा मार्ग ठरवणार आहे. त्यामुळे पारदर्शकता, स्पष्ट भूमिका आणि निश्चित कालमर्यादा या तिन्ही गोष्टी अनिवार्य आहेत. न्यायालयाचा आदेश स्पष्ट आहेआता मॉनिटरिंग कमिटीनेही आपली भूमिका स्पष्ट करून ठोस आणि वेळबद्ध निर्णय द्यावा, हीच सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

# आठवड्याच्या पहिल्याच दिवशी ग्राहकांना सुखद धक्का!

## सोनं झालं स्वस्त, चांदीत ७ हजार रुपयांची घसरण...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** सोमवार, आठवड्याच्या पहिल्याच ट्रेडिंग दिवशी, भारतीय सराफा बाजारावर लाल रंगाचं वर्चस्व पाहायला मिळत आहे. देशांतर्गत बाजारात ट्रेडिंग सुरु होताच सोमवार, १६ फेब्रुवारी रोजी एमसीएक्सवर सोन्याचा दर जवळजवळ १% घसरला, ज्यामध्ये गेल्या सत्रात २% वाढ झालेली पण त्यानंतर अमेरिकेतील चलनवाढीच्या आकडेवारीनंतर अमेरिकन डॉलरच्या उसळीमुळे सोने-चांदीत पडझड झाली.

सोने आणि चांदीच्या किमतीत अचानक वाढ आणि घसरण झाल्याने खरेदीदारांना प्रश्न पडला आहे की, किमती पुन्हा जुने रेकॉर्ड मोडतील की नफा बुकिंगमुळे पुन्हा खाली येतील?



**»» सोन्या-चांदीच्या किंमतीचा उतरता आलेख...**

एमसीएक्सवर सोन्याचा एप्रिल वायदा दर ०.७४% घसरून प्रति १० ग्रॅम १,५४,७४३ रुपये झाला, तर एमसीएक्स चांदीचा मार्च फ्युचर्स ३% घसरणीसह प्रति किलो २,३६,९१५ रुपये झाला. अमेरिकेचा डॉलर निर्देशांक जानेवारीमध्ये यूएस सीपीआय (ग्राहक किंमत निर्देशांक) कमी झाल्यानंतर वाढला, ज्यामुळे मार्चमध्ये होणाऱ्या पुढील धोरण बैठकीत यूएस फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीच्या अपेक्षेवर परिणाम झाला.

गेल्या काही दिवसातील तेजीनंतर नफावसुली आणि स्थिर डॉलरमुळे सोन्या-चांदीच्या किमतींवर दबाव आला असून किमतीतील ही घसरण 'निरोगी सुधारणा' दर्शवते ज्यामुळे बाजाराला नवीन तेजीसाठी तयार करू शकते, असा बाजार विश्लेषकांचा विश्वास आहे. त्याचवेळी, अमेरिकेतील सीपीआय महागाई ०.२ टक्के वाढली, तर डिसेंबरमध्ये महागाईत ०.३ टक्के घट झालेली. वार्षिक आधारावर जानेवारीमध्ये अमेरिकेतील महागाई २.४% वर आली, जी मागील महिन्याच्या २.७% पेक्षा कमी आहे.

**»» अमेरिकेकडे सोन्या-चांदीच्या गुंतवणूकदारांची नजर...**

गुंतवणूकदार महागाई, सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) आणि फेडरल रिझर्व्ह धोरणे यासारख्या प्रमुख अमेरिकन आर्थिक डेटाचे बारकाईने निरीक्षण करत आहेत. अशा परिस्थितीत, संभाव्य व्याजदर कपातीची वेळ आणि गती समजून घेण्यासाठी व्यापारी अमेरिकेतील कामगार डेटा, फेडरल ओपन मार्केट कमिटी (FOMC) बैठकीचे इतिवृत्त आणि फेड अधिकाऱ्यांच्या विधानांचे निरीक्षण करून सोने-चांदीचे गुंतवणूकदार पुढील पाऊल उचलतील.

या आकडेवारीमुळे बाजाराला काहीसा दिलासा मिळाला. मंद चलनवाढीच्या आकडेवारीमुळे गुंतवणूकदारांमध्येयूएस फेडरल रिझर्व्ह नजीकच्या भविष्यात व्याजदरात कपात करण्याचा निर्णय घेण्याची आशा निर्माण झाली. व्याजदर कमी झाल्यावर सोने आणि चांदीसारख्या नॉन-इयल्डिंग मालमत्ता अधिक आकर्षक बनतात.

# वडिलांवरील टीका असह्य, हर्षवर्धन सपकाळांची लेक मैदानात...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसांपासून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी वक्तव्य केल्यानंतर टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरुन चर्चा घडत आहेत. त्यातच, टिपू सुलतानची तुलना थेट शिवाजी महाराजांवर केल्याचे सांगत हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर भाजप नेत्यांकडून तीव्र शब्दात टीका केली जात आहे. आपल्या वडिलांवर होत असलेल्या टीकेला आता त्यांची लेक गार्गी सपकाळ यांनी प्रत्युत्तर दिलंय. खरं तर माझ्या वडिलांचं मूळ वक्तव्य अतिशय स्पष्ट आणि संदर्भासह होतं. शिवाजी महाराजांचा पराक्रम अद्वितीय आहे. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन टिपू सुलतान यांनी कार्य केलं. महाराजांप्रमाणेच त्यांनी कुठल्याही विखारी, विषारी विचारांना थारा दिला नाही, हा त्या वक्तव्याचा आशय होता, असे गार्गी यांनी म्हटले. तसेच, वडिलांचा वारकरी दिंडीतील फोटो शेअर करत गार्गी यांनी टीकाकारांना चोख शब्दात प्रत्युत्तर दिले.

माझ्या वडिलांच्या, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विधानावरुन सध्या राज्यात जाणीवपूर्वक गदारोळ उभा केला जात आहे. हा वाद छत्रपती शिवाजी महाराजांच्या सन्मानासाठी नाही, तर त्यांच्या नावाचा राजकीय गैरवापर करून विरोधकांना बदनाम करण्याचा हा एक सुनियोजित प्रयत्न आहे ज्यांनी सातत्याने महाराजांच्या विचारांना आणि इतिहासाला विकृत करण्याचं काम केलं आहे, तेच आज अचानक अपमान झाल्याचं ढोंग करत आहेत, हीच या संपूर्ण गदारोळामागची खरी राजकीय चाल आहे, असे म्हणत गार्गी यांनी इतिहासाचे अनेक संदर्भ देत वडिलांच्या भूमिकेवर बाजू मांडली. तसेच, वडिलांच्या वक्तव्याचा अर्थही समजावून सांगितला.

खरं तर माझ्या वडिलांचं मूळ वक्तव्य अतिशय स्पष्ट आणि संदर्भासह होतं. शिवाजी महाराजांचा पराक्रम अद्वितीय आहे. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन टिपू सुलतान यांनी कार्य केलं. महाराजांप्रमाणेच त्यांनी कुठल्याही विखारी, विषारी विचारांना थारा दिला नाही, हा त्या वक्तव्याचा आशय होता, असे गार्गी यांनी म्हटले.

हा संदर्भ एका विशिष्ट प्रश्नाशी जोडलेला होता. विविध जाती आणि धर्मांमध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तेढीच्या पार्श्वभूमीवर काही संघटनांनी अशी मागणी केली होती की सर्व शासकीय कार्यालयांमध्ये महामानवांचे फोटो लावावेत, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांसोबत टिपू सुलतान यांचेही फोटो असावेत. या मागणीकडे आपण कसं पाहता? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाच्या उत्तरात, वरील संदर्भात हे वक्तव्य करण्यात आलं. पण आज त्याच वक्तव्याचा हेतुपुरस्सर विपर्यास केला जात आहे. यांच्याच लाडक्या भगतसिंग कोश्यारी यांनी शिवाजी महाराज आता जुने झाले, नवे आयडॉल नितीन गडकरी अशी अपमानास्पद तुलना केली, फुले दाम्पत्याचा अपमान केला, तेव्हा या सत्ताधाऱ्यांच्या तोंडातून एक शब्दही निघाला नाही. उलट अशा व्यक्तीला महाराष्ट्रभूषण देऊन त्यांनी महाराजांप्रती आपली खरी मानसिकता उघडी पाडली. कोरटकर या मा. फडणवीसांच्या जवळच्या व्यक्तीकडून महाराजांचा अपमान होतो, तेव्हा हे गप्प बसतात. मोदी म्हणजे शिवाजी महाराज अशी इतिहासाची विकृती करणाऱ्या महंतांना प्रश्न विचारत नाहीत. राजमाता जिजाऊसाहेबांबद्दल वादग्रस्त आणि अवमानकारक लिखाण करणाऱ्या बाबासाहेब पुरंदरेंना कधी जाब विचारला गेला नाही. म्हणजे जेव्हा अपमान त्यांच्या विचारसरणीतून होतो तेव्हा तो चालतो, हीच या सत्ताधाऱ्यांची दुटप्पी, दडपशाही आणि निवडक नैतिकतेची राजकारणाची परंपरा आहे.



> **❝ गार्गी सपकाळ सध्या काय करतात?**
>
> गार्गी सपकाळ या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या कन्या आहेत त्या लंडन स्थित एका महाविद्यालयात पब्लिक हेल्थ वर शिक्षण घेत आहे व सोबतच दवा आणि दुवा प्रकल्प राबवीत आहेत. गार्गी सपकाळ यांनी आपल्या वडिलांच्या समर्थनार्थ एक भावनिक फेसबुक पोस्ट लिहिली आहे. या फेसबुक पोस्टमध्ये त्यांनी असं म्हटलं आहे की,सत्य ओळखा आणि सत्याच्या बाजूने एकजुटीने उभे राहा, खऱ्या स्वराज्यासाठी एकत्र लढा.!. दरम्यान, गार्गी सपकाळ यांची ही पोस्ट सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून सर्व स्तरातून यावर प्रतिक्रिया येत आहेत.

माझे वडील छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर करणारे आणि त्यांच्या समता, न्याय व लोककल्याणाच्या आदर्शांवर विश्वास ठेवणारे व्यक्ती आहेत, हे वेगळं सांगण्याची गरज नाही. पण ज्यांना महाराजांचा हा समतेचा आणि न्यायाचा विचार मान्य नाही, ज्यांना फक्त प्रतीकांचा दिखावा प्रिय आहे, तेच लोक समाजात द्वेष पसरवतात. दंगली घडवण्याचं वातावरण तयार करतात आणि स्वार्थी राजकारणासाठी महाराजांच्या नावाचा वापर करतात. हा तर खरा महाराजांचा अपमान आहे. स्वराज्य म्हणजे प्रेम, शांतता, न्याय आणि लोकांचा सन्मान. पण महाराजांना मानणारे म्हणवून घेऊन जर लोकांची डोकी फोडली जात असतील, तर तो कुठला विचार आहे? या वादानंतर फेक आयडी तयार करून मला अत्यंत गलिच्छ, स्त्रीद्वेषी आणि अपमानास्पद शिव्या दिल्या जात आहेत. ज्यांना खरंच महाराज कळले असते, ते असं वागले असते का? पण त्यांच्या कार्यशाळा, शाखा आणि प्रचारयंत्रणांमधून जर सातत्याने द्वेषच पेरला जात असेल, तर त्याचेच प्रतिबिंब समाजात दिसणार, यात आश्चर्य ते काय?

शिवराय, जोतिबा-सावित्री फुले, छत्रपती शाहू महाराज, अहिल्याबाई होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक महामानवांचा सामाजिक न्याय, समता आणि कल्याणकारी राज्याचा विचार हा आरएसएसच्या ब्राह्मणवादी विचारसरणीच्या मूलत: विरोधात आहे, त्यांना तो मान्य नाही. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माझ्या वडिलांच्या शब्दांचा विकृत अर्थ लावून, महाराष्ट्रात हिंदू-मुस्लिम तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, तेही शिवजयंतीच्या उंबरठ्यावर! हे एक स्पष्ट राजकीय षड्यंत्र आहे. महाराजांच्या महाराष्ट्रात अशा प्रकारे दूषित वातावरण तयार करून जयंती साजरी करायची, ही वैचारिक विकृतीच म्हणावी लागेल. ज्यांची माथी भडकवली जात आहे, त्यांनी हे ओळखायला हवं की फडणवीस आणि ज्या विचारसरणीतून ते प्रेरित आहेत, ती तुमची फसवणूक करत आहे. तुम्हाला, देशाचं आणि महाराष्ट्राचं ऐक्य जपणाऱ्या माणसांच्या विरोधात उभं केलं जात आहे. आपण अजून किती दिवस या विकृतीला बळी पडणार? ही विकृती तुमचं आयुष्य, तुमचं समाजजीवन आणि शेवटी देशाचं भविष्य उद्ध्वस्त करेल. यापासून सावध राहणं हाच आजचा खरा देशभक्तीचा मार्ग आहे.

**◆ माझ्या वडिलांनी राजकीय उपयोग केला नाही**

शेवटी, महाराजांचा विचार काय आहे हे आम्हाला शिकवण्याचा प्रयत्न करू नये. आम्हाला वैचारिक वारशासोबत पारिवारिक वारसा लाभलेला आहे. आमच्या कुटुंबाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या थेट वारशाशी आणि मराठा राजघराण्यांशी जवळचा संबंध आहे. माझ्या वडिलांची मावशी राजर्षी शाहू महाराजांच्या कदमबांडे घराण्यात लग्न झालेली होती. तसेच, माझ्या आजीचे वडील देवासचे सरदार जाधव होते, जे सिंदखेडराजाच्या जाधव घराण्याशी (जिजाऊ माताश्रींच्या घराण्याशी) जोडलेले आहेत. आणि माझी आत्या बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांच्या वंशज घराण्यात विवाहित आहे. हे सर्व नाते भोसले आणि इतर मराठा राजघराण्यांशी जोडते, पण माझे वडील या ऐतिहासिक वैभवाचा राजकीय उपयोग कधीच करत नाहीत. ही बाब महत्वाची वाटते. ज्यांचा इतिहास अन्याय, शोषण आणि स्त्रीद्वेषाचा राहिलेला आहे, ज्यांना इथली जातीय उतरंड कायम ठेवायची आहे, ज्यांनी सत्तेसाठी गद्दारीची परंपरा जोपासली आहे अशा विचारसरणीच्या लोकांनी तरी महाराजांच्या विचारांचे धडे महाराष्ट्राला देण्याचं ढोंग करू नये. महाराष्ट्र तुमचे डावपेच ओळखतो. महाराष्ट्रातील सर्व पक्षीय आणि सर्व धर्मीय बांधवांना माझं एवढंच सांगणं आहे की, आपल्याला प्रेम, करुणा, न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांवर उभं राहायचं आहे, आणि याच मूल्यांवर महाराष्ट्र घडवायचा आहे. सत्य ओळखा, आणि सत्याच्या बाजूने एकजुटीने उभे राहा. खऱ्या स्वराज्यासाठी एकत्र लढा.

# शासकीय शिवजयंती तिथीनुसार का नाही ?





भारतीय संस्कृतीत वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार म्हणजेच तिथीनुसार साजरे करण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. आजही अनेक घरांत पिढ्यानपिढ्या ही प्रथा जपली जात आहे. बदललेली शिक्षणपद्धती, इंग्रजी भाषेला दिले गेलेले अवास्तव महत्व, तरुणवर्गावर पाश्च्यात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव आणि त्याअनुषंगाने बदलत गेलेले राहणीमान यांमुळे दैनंदिन जीवनात तिथीचा वापर करणे हळूहळू कमी होत गेले. आजमितीला तिथीचा उल्लेख केवळ लग्नपत्रिकांवरच पाहायला मिळतो. या भारतभूमीत होऊन गेलेले देवतांचे अवतार, संत महात्मे यांचे प्रकटदिन, जयंती आणि पुण्यतिथी हे आजही तिथीनुसारच साजरे केले जातात, मकर संक्रांत वगळता हिंदू धर्मातील समस्त सण-उत्सवही तिथीवरच आधारित आहेत. या महाराष्ट्रभूमीत जन्माला येऊन साऱ्या विश्वाला आदर्श राज्यकारभाराचा गुरु मंत्र देणारे, आपल्या अतुल पराक्रमाने, अचाट बुद्धिचातुर्याने, कुशल रणकौशल्याने आणि प्रबळ इच्छाशक्तीने शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील जनतेसाठी अवताराहून कमी नाहीत त्यामुळे त्यांचा जन्मदिन तिथीनुसारच साजरा व्हावा यासाठी अनेक संघटना, संस्था आणि इतिहासप्रेमी आग्रही आहेत. समाज ऐक्यासाठी आणि लोकजागरणासाठी लोकमान्य टिळकांनी शिवजयंती सुरु केली तीही तिथीनुसारच. मात्र त्या काळापासून छत्रपती शिवरायांच्या जन्मतिथीबाबत बराच घोळ आहे. शिवरायांची जन्मतिथी इतिहासकालीन अनेक पुराव्यांमध्ये वेगवेगळी असल्याचे दिसून येते. शिवरायांच्या जन्मतिथीचा हा वाद १०० वर्षांहून अधिक काळ सुरु होता अखेर महाराष्ट्र शासनाने शिवजयंतीची तारीख निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन केली. २००१ साली या समितीने इतिहासकालीन दस्तावेज आणि इतिहासतज्ञांचे मत विचारात घेऊन शिवाजी महाराजांची जयंती म्हणून फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० या तारखेवर शिक्कामोर्तब केले. या तारखेबाबतही एक घोळ झाला आहे. फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ या तिथीला अनुसरून निश्चित केलेली १९ फेब्रुवारी ही तारिख ज्युलियन कॅलेंडरनुसार आहे. ज्युलियन कॅलेंडर आता कालबाह्य झाले असून सध्याची इंग्रजी कालगणना ही ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार प्रचलित आहे. ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ या तिथीला १ मार्च १६३० ही इंग्रजी तारीख येते. १९ फेब्रुवारी ही तारिख राज्यशासनाने गठीत केलेल्या समितीने निश्चित केल्यामुळे सध्या शासकीय शिवजयंती १९ फेब्रुवारीलाच साजरी केली जाते.

शासनाने जरी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी करण्याचे निश्चित केले असले, तरी राज्यातील बहुतांश भागात आजही शिवजयंती तिथीनुसार साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराज भारतातील असे एकमेव राजे असावेत ज्यांची जयंती दरवर्षी इंग्रजी तारखेप्रमाणे आणि हिंदू कालगणनेनुसार तितक्याच जल्लोषात साजरी केली जाते. ज्या शिवरायांनी आपले अखंड आयुष्य हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी वेचले त्यांची जयंती ख्रिस्ती कालगणनेनुसार साजरी व्हावी हे खरेतर मनाला खटकणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना परकीय कालगणना झिडकारून ''राज्याभिषेक शक'' ही स्वकीय कालगणना चालू केली. परकीय चलनाचा वापर थांबवून स्वकीय चलनाची निर्मिती केली. इतकेच नव्हे, तर परकीय भाषा, संस्कृती, आणि तिची प्रतिके झुगारून स्वकीय भाषेत राज्यकारभार केला, स्वसंस्कृतीचे रक्षण केले. मराठी भाषेच्या शुद्धीकरणासाठी शिवरायांनी केलेल्या प्रयत्नांची इतिहासात सविस्तर नोंद आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्यक्ष देव किंवा अवतार नसले, तरी त्यांच्यामुळे हिंदूंच्या मंदिरातील देव शाबूत राहिले, त्यामुळे हिंदूंना ते देवाच्या स्थानी आहेत. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दाखवलेले अफाट शौर्य हे अवतारी कार्याहून कमी नाही, त्यामुळे हिंदूंना ते रामकृष्णादी अवतारांप्रमाणेच पूजनीय आहेत. शिवजयंती देव, अवतार आणि संत यांच्याप्रमाणे तिथीनुसार म्हणजेच फाल्गुन वद्य तृतियेला साजरी केली जावी ही मागणी गेली अनेक वर्षे शिवप्रेमींकडून लावून धरली जात आहे. आजमितीला शिवजयंती केवळ राज्याच्या सीमेपुरती मर्यादित राहिलेली नाही. साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी नागरिक बहुसंख्येने आहेत त्या ठिकाणी शिवजयंती जल्लोषात साजरी केली जाते त्यामुळे ती इंग्रजी तारखेनुसार साजरी व्हायला हवी असे मत राज्याने गठीत केलेल्या समितीतील काही सदस्यांनी व्यक्त केले होते. खरेतर केवळ शिवजयंतीच नव्हे तर गणेशोत्सव, दिवाळी, होळी यांसारखे सण आणि उत्सव भारतीय नागरिक ज्या ज्या देशांत आहेत त्या त्या ठिकाणी प्रतिवर्षी उत्साहाने साजरे केले जातात. हे सारे सण तिथीनुसार साजरे होऊ शकतात मग शिवजयंतीच्या बाबतीत इंग्रजी तारखेचा अट्टाहास संयुक्तिक वाटत नाही. आज राज्य सरकारमध्ये शिवसेना आणि भाजप या शिवप्रेमी आणि हिंदुत्ववादी पक्षांचे वजन अधिक आहे. शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्षाच्या शाखाशाखांतून शिवजयंती उत्सव हे तिथीनुसारच साजरे करण्यात आले आणि यापुढेही ते तिथीप्रमाणेच साजरे केले जातील यात शंका नाही. याआधीही भाजपसोबत सत्तेत असताना शिवजयंती तिथीप्रमाणे साजरी करण्याचा आग्रह शिवसेनेने धरला होता. शिवप्रेमींच्या मागणीखातर गड किल्यांवरील अतिक्रमणाच्या विरोधात कठोर भूमिका घेणाऱ्या माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवप्रेमींची अनेक वर्षे प्रलंबित असलेली ही मागाणीसुद्धा पूर्ण करावी.

**– जगन घाणेकर**

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे





श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली.

त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली.

भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली.

मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला.

पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव.

अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही.

**वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!**

# पैसा : साधन की साध्य?



ज्याच्याकडे पैसा नाही, तो म्हणतो की माणुसकी महत्त्वाची आहे; त्याच्यापुढे पैशाला काही किंमत नाही. अशा कफल्लक लोकांसाठी कोल्ह्याला द्राक्ष आंबट ही म्हण वापरली जाते. ज्याच्याकडे बक्कळ पैसा आहे, तो म्हणतो की पैशापुढे सर्व काही किरकोळ आहे; आई-वडील सोडले तर सर्व काही पैशाने विकत घेता येते. तुमच्याकडे पैसा असेल तरच तुम्हाला किंमत आहे; ज्याच्याकडे पैसा नाही, त्याला कोणी विचारत नाहीअसे काहीजण पैशाबाबत स्वतःचे तत्त्वज्ञान मांडतात. मग प्रश्न पडतोपैसा खरंच चांगला की वाईट? महान की कनिष्ठ? संधी की संकट? साध्य की साधन? पैसा असावा की नसावा?

पैशाविषयीचा हा घोळ पैसा निर्माण झाला तेव्हापासून आजपर्यंत कायम आहे. पैशाचे काटेकोर मोजमाप करणारी बाजारव्यवस्था आणि नीट मोजता न येणारी मानवी नैतिकता यांतील फरक हा घोळ टिकवून ठेवतो. सन्मार्गाने पैसा कमवण्यासाठी आपल्याला एखादे विशिष्ट उत्पादन किंवा सेवा विकावी लागते. मिळालेल्या पैशातून आपण स्वतःला आवश्यक असणाऱ्या सेवा व उत्पादने इतरांकडून विकत घेतो. विविध देशांत या चलनव्यवस्थेला वेगवेगळी नावे आहेतडॉलर, युरो, येन, रुपयाही काही प्रबळ चलनांची नावे जगभर आपली ताकद व्यक्त करतात. तसेच नाणी, नोटा, बँकेतील डिजिटल आकडे, बिट्स, कॉइन इत्यादी रूपांत पैसा भौतिक आणि आभासी स्वरूपात प्रकट होतो.

तसं पाहिलं तर नाणी, नोटा किंवा डिजिटल पैसा हे सर्व स्वतःमध्ये निरर्थकच आहेत. भारतात ८ नोव्हेंबर २०१६ रोजी ₹५०० आणि ₹१,००० च्या नोटा बंद करण्यात आल्या आणि २०२३ मध्ये ₹२,००० च्या नोटा मागे घेण्यात आल्या. नोटबंदीची घोषणा होताच एका रात्रीत या नोटा टाकाऊ ठरल्या. नाणी-नोटा आपण खाऊ शकत नाही; त्यांचे छप्पर बनवू शकत नाही; अंगावर परिधान करून लज्जारक्षणही करू शकत नाही. तरीसुद्धा पैशामुळे मानवी संबंधांत पारदर्शक विनिमयता आली आहे. पैसा माणसाचे मनोधैर्य वाढवणारा प्रेरणास्रोत ठरतो. पैशामुळे माणूस कर्तृत्ववान, साहसी आणि खंबीर बनतो; तो उद्योगशील होतो. जर बौद्धिक कष्टांमागे पैसा हे साधन असेल, तर अशा वेळी पैसा मानवी जीवन सुसह्य, समृद्ध आणि सुखी करणारा उत्प्रेरक ठरतो. पेटंट मिळवणे आणि त्यासाठी संशोधन करणेया बौद्धिक कष्टांमधून मोठ्या प्रमाणावर अर्थार्जन होत असेल, तर ते संशोधन मानवी जीवनाला नव्या दिशा देणारे ठरते.

परंतु प्रत्येक गोष्टीचे मूल्यमापन आपण पैशात करू शकत नाही. लहान मुलाला आईच्या कुशीत मिळणारा आनंद पैशात मोजता येत नाही. क्रिकेटच्या सामन्यात विजय मिळाल्यानंतर खेळाडूंना होणारा आनंद पैशात तोलता येत नाही. अनेक वर्षांनी भेटलेल्या मित्रांमधील खुशी पैशात व्यक्त करता येत नाही. एखाद्या चित्रकाराच्या प्रदर्शनात त्याची चित्रे पाहताना मिळणारे नेत्रसुख पैशात मोजता येते का? तमाशा कलावंतांच्या नृत्य, गायन आणि अदाकारीने भारावून जाऊन काही प्रेक्षक आपल्या खिशातील सर्व पैसे तिच्यावर उधळत असत; त्याला दौलतजादा असे म्हणत. हा प्रकार केवळ पैशाचे प्रदर्शन नसून, कलावंतांच्या कलेला दाद देण्याचा आणि त्यांना प्रोत्साहन देण्याचा एक मार्ग होता. त्या क्षणी प्रेक्षकाला आपल्या जवळील पैसा कलेपुढे क्षुल्लक वाटत असे. ही सारी उदाहरणे पैशाला कमी लेखण्यासाठी नसून, पैशापेक्षा श्रेष्ठ काहीतरी असते हे सांगण्यासाठी पुरेशी आहेत.

मान-सन्मान, पद-प्रतिष्ठा, कीर्ती, जीवनातील आनंद, मनःशांती, कलास्वाद, नातेसंबंधअशा अनेक गोष्टी आहेत ज्या पैशावर मात करू शकतात.

ज्याप्रमाणे तलवारीचे महत्त्व ती धारण करणाऱ्यावर ठरते, त्याचप्रमाणे पैशाचेही आहे. तलवारीने एखाद्याचा जीव घेता येतो, तर एखाद्याचा जीव वाचवता येतो. पैसा देखील तसाचतो कसा वापरला जातो यावर त्याचे चांगुलपण किंवा वाईटपण ठरते. काही व्यापारी खरेदी-विक्रीत एक रुपयाही सोडत नाहीत; पण दान करताना सढळ हाताने मदत करतात. स्वतःचे कर्तव्य पार पाडताना पैसा दुय्यम मानला पाहिजे. वृद्ध आई-वडिलांच्या उपचारांसाठी खर्च करताना पैशाचा हिशोब लावू नये. जो पैसा ज्या कामासाठी मिळाला आहे, तो त्याच कामासाठी प्रामाणिकपणे खर्च केला पाहिजे. पैशासाठी केलेला भ्रष्टाचार, लुटमार आणि अपहार हे अक्षम्य गुन्हेच आहेत.

खरंच, पैशाचे पुराण सांगावे तेवढे कमीच आहे. पैसा ना पूर्णपणे चांगला, ना पूर्णपणे वाईटतो केवळ एक साधन आहे. त्याला योग्य दिशा दिली तर तो विकासाचे दार उघडतो; चुकीच्या मार्गाला वळवला तर विनाशाचे कारण ठरतो. म्हणूनच, पैशाला नव्हे तर माणुसकीला श्रेष्ठ मानून पैशाचा सुजाण वापर करणेयातच खऱ्या समृद्धीचे गमक दडलेले आहे.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

## नकली

चालले असता भले
उगाचंकरता उंगली
स्पोटके खूप भरली
लगेचं भडके दंगली

एक व्हिडिओ टाके
अब्रु वेशीवर टांगली
बातमी असून सरळ
अफूबगैरच झिंगली

भक्ष्य स्थानी पडली
वस्तीअसून चांगली
ब्रेकिंग न्यूज करिता
मात्र मिडीया गुंगली

भोळीभाबडी जन्ता
राजकारणी फसली
आपलेहक्क सोडून
विश्वास ठेवू बसली

जातीची समीकरणे
निष्कारण रे घुसली
कसे हो शुध्दीकरण
गर्दीअधिक नासली

हळू हळू मूठ उघडे
आज पर्यंत झाकली
खोटे झाले असेमोठे
सत्य कमान वाकली

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पिक विमा मिळण्यासाठी काँग्रेसच्या वतीने तहसीलदारांना निवेदन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१६, पालम (परभणी) :** पालम तालुक्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांची सर्व पिके होत्याची नव्हती झाली आहेत. प्रचंड काबाडकष्ट करून व अतोनात खर्च करून शेतकऱ्यांच्या हातात काहीच लागले नाही. अशा परिस्थितीत शासनाकडून शेतकऱ्यांना भरघोस आर्थिक मदत मिळणे अपेक्षित होते होती परंतु ती अत्यंत तुटपुंजी रक्कम मिळालेली आहे, यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत असून आत्महत्या करीत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याला खरीप पिक विम्याची गरज आहे,परंतु खरीप पिकाचा मौसम संपून गेला तरी पालम तालुक्यातील शेतकऱ्यांना अद्याप यावर्षीचा खरीप पिक विमा भेटलेला नाही. तरी सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ पिक विमा मिळवून द्यावा,तसेच मागील तीन वर्षापासून रखडलेला इ.स. २०२२, २३ , २४ व २५ यावर्षीचा पिक विमा सुद्धा देण्यात आलेला नाही तो ही त्वरित देण्यात यावा अशा आशयाचे निवेदन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, पालम शाखेच्या वतीने नुकतेच तहसीलदारांना देण्यात आले.

सदरील निवेदनावर माधवराव फाजगे, अकबर पठाण, अबरार काजी, जाफर पठाण, साबीरभाई कुरेशी, वैजनाथ हत्तीअंबीरे, माधवराव फुलपगार, अंबादास ठाकूर, रवी सिरसकर सह इतर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या व असंख्य शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

## गुरुमाऊली नगर (बोर्डा) येथे सिमेंट काँक्रीट नालीचे भूमिपूजन संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, वरोरा (चंद्रपूर) :** वरोरा पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत बोर्डा, गुरुमाऊली नगर येथे वरोरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार करण देवतळे यांच्या हस्ते नागरी सुविधा योजनेअंतर्गत १० लाख रुपये निधीतून अमोल देठे यांच्या घरापासून ते धात्रक यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रीट नाली बांधकामाचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून आमदार करण देवतळे प्रमुख उपस्थित होते. यावेळी सरपंच राहुल ठेंगणे, डॉ. विजय देवतळे, सुनिल भोयर, कन्हैयालाल जयस्वाल, शंभूनाथ वरघने, ओमजी मांडवकर, विजय मोकाशी, विठ्ठल लेडे, मोरे सर, वंदनाताई दाते, अनितातार्ई देशेट्टीवर, अमृताताई सुर, किशन सुर, बघिलेजी, राजेंद्र पांडे सर, प्रिया भोयर, देविदास महाकाळकर, लडके साहेब, धंदरेजी, मधुसुधन टिपले, निंबाळकरताई, राजू मिश्रा, वाकडे ताई, यशवंत सहारे, महेश लोंढे, लता काटवले, तृप्ती देठे, कांचन निखारे, अवंती टापरे, संध्या आत्राम, रंजना खटके, क्षीरसागर, गुरुनुले तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कळंबोली मध्ये अनधिकृत बॅनरवर धडक कारवाई




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, पनवेल :** महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ब कळंबोली हद्दीतील मार्बल मार्केट ते खांदा कॉलनी ब्रिज पर्यंतच्या मुख्य हायवेवरील सर्व अनाधिकृत बॅनर्सवरती अतिक्रमण पथकामार्फत कारवाई करण्यात आली.

आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार प्रभाग समिती ब चे प्रभाग आयुक्त तथा सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर व प्रभारी अधिक्षक राजेश डोंगरे यांनी अतिक्रमण विभागाच्या सहाय्याने ही कारवाई केली. पनवेल महानगरपालिकेच्या प्रभात समिती ब कळंबोली मधील मार्बल मार्केट ते खांदा कॉलनी ब्रिज पर्यंतच्या मेन हायवे वरील सुमारे ४०-५० अनाधिकृत बॅनर्स अतिक्रमण पथकामार्फत काढण्यात आले.

# द्राक्ष उत्पादकांसाठी खुशखबर!

## खानगाव नजिक आणि उगाव केंद्रांवर बुधवारपासून 'द्राक्षमणी' लिलाव सुरु

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव बाजार समितीच्या वतीने खानगाव नजिक आणि उगाव येथील तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रांवर बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ पासून द्राक्षमणी लिलावाचा शुभारंभ होत आहे. या निर्णयामुळे परिसरातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डीके) जगताप यांनी दिली.

**प्रमुख ठळक वैशिष्ट्ये :**

लिलावाची वेळ: बुधवारपासून दररोज दुपारी ०४:०० वाजता.

**रोख पेमेंटची सोय :** शेतीमालाच्या वजनमापानंतर शेतकऱ्यांना लगेच रोख पैसे देण्याची व्यवस्था बाजार समितीने केली आहे.

**स्पर्धात्मक बाजारभाव :** लिलावासाठी अनेक व्यापारी इच्छुक असल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य आणि स्पर्धात्मक भाव मिळण्यास मदत होईल.



**व्यापाऱ्यांसाठी आवाहन !**

जे नवीन व्यापारी द्राक्षमणी खरेदीसाठी इच्छुक आहेत, त्यांनी आवश्यक अटी व शर्तींची पूर्तता केल्यास त्यांना तातडीने परवाना (लायसेन्स) दिला जाईल. अधिक माहितीसाठी बाजार समितीच्या लासलगाव मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.

**कायदेशीर कारवाई :** बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात परवान्याशिवाय थेट शिवार खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**लाभ घेणारी गावे :**

या केंद्रांमुळे खानगाव नजिक, उगाव, नांदगाव, डोंगरगाव, रूई, धानोरे, कोळगाव, खेडलेझुंगे, धारणगाव वीर, धारणगाव खडक, नांदूरमध्यमेश्वर, गाजरवाडी, नैताळे, सोनेवाडी, श्रीरामनगर, शिवरे, शिवडी, खेडे, वनसगाव, नांदुर्डी, कुंदेवाडी, खडक माळेगाव, सारोळे खुर्द आणि रानवड या गावांतील शेतकऱ्यांची सोय होणार आहे.

**लिलाव शुभारंभ वेळ :**

**खानगाव नजिक केंद्र :** दुपारी ०४:०० वाजता.

**उगाव केंद्र :** दुपारी ०५:०० वाजता

याप्रसंगी परिसरातील सर्व सेवा सहकारी सोसायट्यांचे सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी बांधव आणि व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सचिव नरेंद्र वाढवणे व उपसभापती संदीप (ललीत) दरेकर यांनी केले आहे.

# केळशी येथील मनोरुग्ण महिलेच्या त्रासाने आडे पाडले येथील ग्रामस्थ हैराण

**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.१५, दापोली (रत्नागिरी) :** दापोली तालुक्यातील आडे पाडले येथील ग्रामस्थ, दुकानदार तसेच हॉटेल व्यावसायिक सध्या एका गंभीर समस्येला सामोरे जात आहेत. केळशी येथील एक मनोरुग्ण महिला दररोज आडे पाडले गावात येऊन नागरिकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

सदर महिला अर्धनग्न अवस्थेत गावात फिरताना दिसून येते. ती रस्त्यावर मोठमोठ्याने ओरडत असते,



तसेच गावातील नागरिकांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री अपरात्रीही ही महिला अनवाणी व अर्धनग्न अवस्थेत गावात फिरत असल्यामुळे महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

याशिवाय सदर महिला गावातील दुकाने व हॉटेलमध्ये जाऊन जबरदस्तीने खाण्याची मागणी करते. मागणी पूर्ण न झाल्यास दुकानदारांना व हॉटेल व्यावसायिकांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत असल्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. त्यामुळे व्यावसायिकांचे कामकाज विस्कळीत होत असून ग्राहकांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

या सततच्या त्रासामुळे आडे पाडले येथील ग्रामस्थ हैराण झाले असून संबंधित प्रशासन, ग्रामपंचायत व पोलिसांनी याकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, तसेच सदर महिलेला उपचार व सुरक्षित निवाऱ्याची व्यवस्था करून द्यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# विकास हा तळागाळापर्यंत पोहोचायला हवा : उद्योजक दिलीप दाते

## भोयरे पठार- खुर्दमध्ये ७० लाखांच्या विकासकामांचा शुभारंभ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील भोयरे पठार व भोयरे खुर्द येथे सुमारे ७० लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आमदार काशिनाथ दाते यांचे चिरंजीव उद्योजक दिलीप दाते यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी बोलताना उद्योजक दिलीप दाते यांनी सांगितले की, पारनेर-नगर मतदारसंघात सर्वदूर विकासकामे सुरू असून विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. विकास हा तळागाळापर्यंत पोहोचायला हवा त्या जाणिवेतून सातत्याने नवीन निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई




अजितदादा पवार तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभत असल्याचे त्यांनी नमूद केले.

समारंभासाठी अकोळनेर गावचे सरपंच प्रतीक शेळके, छबू कांडेकर, राजेश बोरकर, अरुण पंडित, राजेश बोरकर, डॉ. अमोल टकले, आप्पा मुठे, सागर कदम, संजय मुठे, कृष्णकांत टकले, अशोक टकले, अशोक उरमुडे आप्पा मुठे, योगेश गाडे, राहुल आंबेकर यांसह भोयरे पठार गावचे आजी-माजी सरपंच, उपसरपंच, सेवा सोसायटीचे चेअरमन तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी भोयरे खुर्द येथील सभामंडप, भोयरे पठार येथील सभामंडप, भोयरे खुर्द ग्रामपंचायत कार्यालय, भोयरे पठार येथील ४५० मीटर डांबरीकरण रस्ता तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळील रस्ता काँक्रिटीकरण या कामांचे उद्घाटन करण्यात आले. सुमारे ७० लाख रुपयांच्या या विकासकामांमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून गावाच्या पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होणार असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

● पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही सर्व कामे मंजूर होऊन पूर्णत्वास आले आहे. आ. दाते यांच्या नेतृत्वाखाली विकासाची ही गती भविष्यातही कायम राहील, असा विश्वास ग्रामस्थांसह जनतेच्या मनात राहील असं काम आम्ही करणार.

**- दिलीप दाते,**
**उद्योजक पारनेर**

# चंद्रपूरात महाशिवरात्रीची दिव्य अनुभूती ; 'महाकाल श्रृंगार महादेव' दर्शनासाठी भाविकांचा जनसागर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त लालपेठ माता नगर चौक येथे असलेल्या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या महाशिवलिंग स्थळी आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून दिव्य आणि अलौकिक धार्मिक वातावरण अनुभवायला मिळाले. उज्जैन महाकालेश्वर यांच्या धर्तीवर साकारण्यात आलेल्या 'महाकाल श्रृंगार महादेव' दर्शनासाठी हजारो भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने उपस्थिती लावली. 'हर हर महादेव' च्या अखंड जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. आकर्षक फुलांची सजावट, दिव्य रोषणाई, धूप-




दीप आणि वेदमंत्रांच्या निनादात भक्तांनी महादेवाचे दर्शन घेत आत्मिक समाधान अनुभवले. पहाटेपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. रुद्राभिषेक, महाआरती, महाकाल श्रृंगार दर्शन तसेच भजन-कीर्तनाच्या कार्यक्रमांनी वातावरण पूर्णतः शिवमय झाले होते. रात्री ठीक ११ वाजता शिव-पार्वती विवाह सोहळा मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक धार्मिक विधींसह पार पडला. वेदमंत्रांच्या साक्षीने साजऱ्या करण्यात आलेल्या या दैवी विवाह सोहळ्याने भाविकांना भक्ती आणि आनंदाची अनोखी अनुभूती दिली. शिव-पार्वतीच्या मंगलाष्टकांनी आणि टाळ-मृदुंगाच्या निनादाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. उपस्थित भाविकांनी या सोहळ्याचा अनुभव घेतला.

या भव्य धार्मिक सोहळ्याची संपूर्ण व्यवस्था आ. किशोर जोरगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. भाविकांसाठी शिस्तबद्ध दर्शनरांग, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता आणि प्रकाशयोजना यांची विशेष काळजी घेण्यात आली होती. यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले, महाशिवरात्री हा केवळ उत्सव नसून तो आत्मशुद्धी आणि श्रद्धेचा पवित्र सोहळा आहे. मागील श्रावण महिन्यात आपण या जागृत आणि अतिप्राचीन शिवलिंग स्थळी भव्य कार्यक्रम आयोजित करून या पवित्र स्थळाची ओळख राज्यभर पोहोचवली. आज 'महाकाल श्रृंगार' दर्शनाच्या माध्यमातून चंद्रपूरच्या धार्मिक वैभवात आणखी भर पडली आहे. हे स्थान चंद्रपूरच्या आध्यात्मिक ओळखीचे प्रतीक आहे. भाविकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देत या क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्याचा आपला संकल्प आहे. भगवान महादेवाच्या कृपेने हा महोत्सव भक्तिभाव, शिस्त आणि उत्साहात पार पडत आहे, ही अत्यंत समाधानाची बाब असल्याचे ते म्हणाले. महाप्रसादाच्या कार्यक्रमाने या भक्तिमय सोहळ्याचा समारोप करण्यात आला.

अक्षराज



# राज्य कबड्डी संघटनेतील मनमानी संपुष्टात; एक जिल्हा एक कबड्डी संघ नियम

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.१६, मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वरदहस्थामुळे महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेत हम करो से कायदा अशा मनमानी कारभार करणाऱ्या बाबुराव चांदोरे यांची अखेर कबड्डी संघटनेतून हकालपट्टी करण्यात आली आहे. आता त्यांच्या जागी नाशिकच्या मोहन गायकवाड यांच्याकडे प्रभारी सहकार्यवाह पदाची जबाबदारी सोपवण्यात आली असून माजी खासदार गजानन कीर्तिकर हे प्रभारी अध्यक्षपद सांभाळतील. राज्य संघटनेच्या निवडणुकीला न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली असून ती स्थगिती लवकरच हटवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यानंतर नव्याने निवडणुका घेतल्या जातील.

गेली ३ वर्षे राज्य कबड्डी संघटनेचे सहकार्यवाह म्हणून अजित पवार यांनी आपले निकटवर्तीय बाबुराव चांदेरे यांच्याकडे सहकार्य पदाची सूत्रे सोपवली होती. तेव्हापासून चांदोरे यांनी कबड्डीसाठी कोणालाही विश्वासात न घेता कबड्डीची दादागिरी दाखवत आणि स्वतःच्या बाबुराव चांदोरे फाउंडेशन या कबड्डी संघाला मजबूत करण्यासाठी त्यांनी अनेक जिल्ह्यांच्या संघांना आणि खेळाडूंना फोडत अनेकांची नाराजी ओढवली. एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या संघातील खेळाडूंना जिल्हा संघात स्थान मिळावे म्हणून महानगरपालिका असलेल्या जिल्ह्यांचे दोन दोन संघ करण्याचा अनोखा प्रकार केला होता.

राज्य कबड्डी संघटनेच्या मुख्यालयात दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या तातडीच्या बैठकीत बाबुराव चांदोरेचा मनमानी कारभारा संदर्भात संपवताना त्यांच्या हकालपट्टीचा निर्णय घेण्यात आला तसेच त्यांनी जिल्ह्यांच्या वाढवलेल्या संघांचा निर्णय पूर्वीप्रमाणे एक जिल्हा एक कबड्डी संघ असा केला. त्यांच्या या निर्णयामुळे कबड्डीचा किती फायदा झाला त्याची कल्पना नाही. आता त्यांच्या हकालपट्टीनंतर राज्यसंघाला बळकट्टी देण्याचे आवाहन नव्या प्रभारीपुढे असेल.

# इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट पाटण ने दरवर्षी प्रमाणे यावर्षी 'बॉलिवूड नाईट'

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण (सातारा) :** कोयना एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट पाटण ची स्थापना एप्रिल २०२२ रोजी झाली. कॉलेज ला महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई बोर्डाची मान्यता असून कॉलेज अंतर्गत हॉटेल मॅनेजमेंटचे डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्सेस चालवले जातात.

हॉटेल मॅनेजमेंट मध्ये विद्यार्थ्यांना संपूर्ण हॉटेल व्यवस्थापन कसे असते? याचा अभ्यास घेतला जातो. विद्यार्थ्यांना कूकिंग, बेकिंग, सर्विस, रूमचे व्यवस्थापन, गेस्टचे आदरातिथ्य या गोष्टी शिकवल्या जातात. व हे शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना विविध उपक्रमास सामोरे जावं लागते. त्यापैकी एक म्हणजे फूड फेस्टिवल, फूड फेस्टिवल सादर करण्यामागचा हेतू म्हणजे विद्यार्थ्यांचे कलागुण, त्यांचे मार्केटिंग कौशल्य, त्यांना भेटणारा कूकिंगचा, सर्विसचा अनुभव जो त्यांना पुढे करियर घडवताना अतिशय मौल्यवान ठरत असतो. फूड फेस्टिवल म्हणजे काय तर थोडक्यात आलेल्या पाहुण्यांसाठी पदार्थाची रेलचेल. मग या पूर्ण फूड फेस्टिव्हलची तयारी विद्यार्थी स्वतः करत असतात. याच अनुषंगाने इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट पाटण ने दरवर्षी प्रमाणे यावर्षी बॉलिवूड नाईट (इेश्रश्रूुेव छळसहीं) या थिम वर फूड फ ेस्टिवल करण्याचे आयोजन केले होते. हा फूड फेस्टिवल कॉलेजच्या संकुलनात मोठ्या उत्सहात संप्पन झाला.

या फूड फेस्टिवलचे उदघाटन संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, डॉ.चव्हाण, डॉ.बी.एन.पाटील, डॉ. खोत यांनी केले. अशा फूड फेस्टिवल चे आयोजन पाटण नगरवासियांसाठी अतिशय नवखे होते. त्यामुळे प्रत्येक अतिथी मध्ये एक वेगळीच कुतूहलता पहावयास मिळाली. बॉलिवूड थिम असल्याकारणाने परिसरातील संपूर्ण वातावरण या थिमशी मिळते जुळते करण्यात आले होते. त्यामुळे कार्यक्रमाची उत्कंठा प्रेक्षकांमध्ये पाहता आली. या फ ूड फेस्टिवलमध्ये इंडियन, कॉंटिनेंटल अशा पदार्थांची रेलचेल पहावयास मि ळाली. वेलकम ड्रिंक म्हणून लेमन मिंट कूलर, लाईव्ह स्वीट कॉर्न चाट , रेड सॉस पास्ता, हॉट न सोर सूप, फिश करी, चिकन लाल मांस, मटण मसाला, दाल मखनी, पनीर दो प्याजा, बिर्याणी राईस, दुधी हलवा अशा चविष्ट पदार्थांची मेजवानी पाटण नगर वासियांसाठी केलेली



होती. या मेनू ची नावे देखील थिम ला साजेशी ठेवण्यात आली होती जसे कि मोगॅम्बो कूलर, दबंग देसी कॉर्न, कुछ कुछ होता है सूप, मटण ना मिलेगा दोबारा, गुमनाम रोटी बास्केट, तेरे नाम राईस, दिलवाली रबडी, दाल तो पागल है, पनीर हेरा फेरी, गोलमाल पास्ता इत्यादी. तसेच आलेल्या पाहुण्यांना मनोरंजनासाठी बॉलिवूड गाणी, डान्स, मुलांसाठी आणि तरुणाईसाठी सेल्फीपॉईंट असे काही आयोजित करण्यात आले होते. संपूर्ण फूड फेस्टिवलचे आयोजन हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या म ार्गदर्शनाखाली केले.

पाटण शहरातील नामवंत व्यावसायिकांनी या उपक्रमास आपला प्रतिसाद विद्यार्थ्यांना स्पॉन्सरशिप स्वरूपात दर्शविला; आदिती आरंभ, फास्टट्रॅक एजुकेशन, अमर साबळे असोसिएट, रत्नश्री कलेक्शन, अंबिका ज्वेलर्स, आपला बाजार, श्रीराम नागरी पतसंस्था, अछ फिश, सुस्वाद हॉटेल, दरबार बिर्याणी, मॉन्जिनीज आणि अशा बऱ्याच व्यावसायिकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

पाटण वासियांसाठी हा नवीन अनुभव असल्याने त्यांनी देखील विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले.आदरणीय श्रीमंत विक्रमसिंह पाटणकर, युवा नेते श्रीमंत सत्यजितसिंह पाटणकर यांनी देखील विद्यार्थ्यांच्या या उपक्रमास भरभरून शुभेच्छा दिल्या. कॉलेज चे प्राचार्य चेतन सावंत, प्रा.अम ोल चव्हाण, प्रा.समीर सपकाळ, प्रा.भरत कांबळे तसेच इतर शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

# सोयगाव नगरपंचायतीच्या तळमजल्यावरील शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधकामाचे भूमिपूजन

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१६, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक तो निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देवू असे प्रतिपादन आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले. शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा सुरळीत मिळाव्यात. यासाठी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि प्रकाश व्यवस्था या बाबींना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सोयगाव नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीच्या तळ मजल्यावर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधकाम करणे व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानंतर्गत नवीन पाणी पुरवठा योजना ३ वार्डमध्ये कार्यान्वित करणे या कामांचा शुभारंभ आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार अब्दुल सत्तार बोलत होते.याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकरराव (आबा) काळे, माजी जि.प.सदस्य राजेंद्र राठोड, शिवसेना तालुकाप्रमुख धरम सिंग चव्हाण, देविदास पालोदकर, नगराध्यक्षा आशाबी तडवी, गटनेते अक्षय काळे, नगरसेवक संतोष बोडखे,



कदीर शहा, गजानन कुडके, राजू दुतोंडे, हर्षल काळे, दीपक पगारे भगवान जोहरे, लतिफ शहा, किशोर म ापारी,अशोक खेडकर, शेख रौफ, विष्णू इंगळे, बाबू चव्हाण, दारासिंग चव्हाण, मोतीराम पंडित, उस्मान पठाण, सलीम पठाण, एलीयस पठाण, सोपान पाटील, शिव आप्पा चोपडे, सांडू तडवी, राधेश्याम जाधव, फिरोज पठाण, मुक्तार शेख, भीमा बोराडे, शेख जाकेर, बाळू पाटिल, राजमल पवार, डॉ.देशमुख, मेघराज राठोड, विजू काळे, समाधान तायडे, दिलीप देसाई, रमेश गव्हाडे समाधान काळे, उत्तम गवळे, विष्णू वाघ, भरत राठोड, अविनाश पाटील, कुणाल राजपूत, रवींद्र राजपूत, सुनील निकम, रमेश वामणे, गोकुळ रोकडे, जगू मिसाळ, विशाल चव्हाण, राणीदास चव्हाण, श्रावण राठोड, हिरा राठोड, रमेश राठोड, स्वानंद पाटिल,विनोद राठोड,गणेश खैरे, सुभाष वाडकर, मल्लूसिंग चव्हाण, अमोल मापारी आदींची उपस्थिती होती. पुढे बोलत असतांना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, सोयगाव नगर पंचायत प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येणार आहे. नगर पंचायत प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या विविध विकास कामांना लवकरच मंजुरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सोयगाव शहराच्या विकासासाठी निधीची कोणतीही कम तरता भासू दिली जाणार नाही. रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधांवर विशेष भर दिला जाईल. शहरातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यात येईल. कचरा व्यवस्थापनासाठी नवीन यंत्रसामग्री खरेदी, एलईडी दिव्यांद्वारे वीज बचत, जलसंधारण उपक्रम आणि पर्यावरणपूरक प्रकल्प राबविण्याचे नियोजन असल्याचेही त्यांनी सांगितले.

# देवखेळ वेबसिरीजचे प्रक्षेपण त्वरित थांबवा

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१६, गुहागर (रत्नागिरी) :** दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी पासून झी ५ या मराठी ओटीटीवर सुरु करण्यात आलेली देवखेळ नामक वेबसिरीज मध्ये संकासुराला क्रूर आणि अंधश्रद्धा पसरविणारा म्हणून दाखविण्यात आले असल्याने संबंधितावर तातडीने कारवाई होण्याबत नमन लोककला संस्था (कार्यक्षेत्र भारत) संस्थेच्या वतीने सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ गुहागर तहसील तसेच पोलीस ठाणे यांना निवेदन देण्यात आले असून निवेदनात म्हटले आहे की, कोकणच्या कला संस्कृतीला प्रामुख्याने गुहागर मध्ये जोपसलेल्या देवखेळी परंपरेला झी ५ मराठीने संकासूर बाबत चुकीचे चित्रीकरण करून समस्त गुहागर सह कोकण वासियांच्या भावना दुखावल्याच्या समाज म ाध्यमावर प्रतिक्रिया उमटत आहेत.

तसेच कोकणी लोककलावंत आणि समस्त नागरिकांच्या देखील संतप्त भावना पहावयास मिळत




## गुहागर तहसील आणि पोलीस प्रशासनाला निवेदन

आहेत. हा असंतोष दिवसेंदिवस वाढीस लागत आहे. देवखेळ या वेबसेरिज मधून दर्शविण्यात आलेल्या कथानक व काही आक्षेपहार्य दृशांचा सर्वत्र निषेध व्यक्त केला जात आहे.

आमची नमन लोककला संस्था (कार्यक्षेत्र-भारत) ही संस्था नमन व संकासूर लोककलेशी निगडित असल्याने लोककलावंतांची या संबंधित मागणी आम च्या संस्थेकडे जोर धरू लागली आहे.म्हणून संबंधित देवखेळ ह्या वेबसिरीजचे निर्माते, दिग्दर्शक आणि लेखक यांना त्वरित या वेबसिरीजचे प्रक्षेपण थांबविण्याचे निर्देश द्यावेत व योग्य ती कारवाई करावी, स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिताचे पालन करून गुहागर तालुक्यातील जनतेची तसेच नमन मंडळांची सदर विषयी व्यक्त करण्यात येणारी निषेधाची तीव्रता लक्षात घेऊन गुहागर तालुक्यातील सामाजिक सलोखा राखण्याबरोबरच प्रशासनाला सहकार्य करण्याची भूमिका संस्था म्हणून घेतल्याचेही निवेदनात म्हटले असून सदर विषयांसंदर्भात गांभीर्याने विचार करावा अशी विनंती करण्यात आली आहे.

सदर निवेदन देताना न.लो.संस्था तालुका शाखा उपाध्यक्ष जगन्नाथ शिंदे, सचिव संदीप कानसे, सहसचिव सुधीर टाणकर, संतोष कानसे आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

## थोडक्यात

# तांदळाऐवजी रेशनकार्ड धारकांना गव्हासोबत मिळणार मका

## जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या मका खरेदी सुरू

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** राज्य शासनाकडून अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना गहू, तांदळाचे नियमित वाटप केले जाते. परंतु मार्च

महिन्यापासून रेशनकार्डधारकांना स्वस्त धान्य दुकानातून तांदळा ऐवजी गव्हासोबत मका मिळणार आहे. जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यात ८ केंद्रावर मका खरेदी करण्यात येत आहे. ही खरेदी केलेली मका रेशनदुकानातून लाभार्थ्यांना दिली जाणार आहे. आतापर्यंत १५ हजार क्विंटल मका खरेदी करण्यात असून २८ फेब्रुवारीपर्यंत खरेदी सुरु राहाणार आहे. खरेदी करण्यात आलेली संपूर्ण मका लाभार्थ्यांना दिली जाणार असल्याने पुढील तीन महिने रेशनवर गव्हासोबत मका मिळण्याची शक्यता आहे. अंत्योदय योजनेतील कुटुंबांना १० किलो मका व ११ किलो गहू मिळणार आहे. तर प्राध्यान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना प्रत्येकी दोन किलो गहू व एक किलो मका दिली जाणार आहे. जिल्ह्यात अंत्योदय योजनेचे ८७ हजार ६४ कार्डधारक आहेत, तर ३ लाख ८६ हजार ३४ लाभार्थी आहेत. प्राधान्य कुटुंब योजनेचे ६ लाख ३७ हजार ११४ रेशनकार्डधारक आहेत, तर २५ लाख ६३ हजार ९७१ लाभार्थी आहेत. जिल्ह्यात नगर, घारगाव, श्रीगोंदा, घोगरगाव, मिरजगाव, शेवगाव, पाथर्डी व कोपरगाव येथील फेडरेशन केंद्रावर मका खरेदी केली जात आहे. तर जामखेड व संगमनेर येथील केंद्रावर शेतकर्यांची नोंदणी झालेली नाही.

# के.रामलू शाळेच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**अक्षराज : दत्ता हमंद**



**दि.१६, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील के.रामलू शाळेतील इयत्ता दहावीच्या शालेय विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच संपन्न झाला. सदरील निरोप समारंभासाठी या शाळेचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार, संचालिका रमा ठक्कुरवार, प्रिंसिपल जाधव व्हाय प्रिंसिपल एम.सपना, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष दरबस्तेवार, प्रा.माधव हळदेकर माजी अध्यक्ष मुकेश जोशी, जि.प. मुख्याध्यापक संदीप कमठाणे, पत्रकार गणेश कत्रूवार,पालक प्रतिनिधी राजेश्वर इंदूरकर,आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी या शाळेतील विद्यार्थ्यांनी अनुभव मनोगत कथन व्यक्त करताना सांगितले की, शाळेच्या शिक्षकांनी खूप मेहनत घेऊन आम्हाला शिकवले. त्यांची मेहनत आम्ही वाया जाऊ देणार नाही. शालेय स्मृती जागवत शाळेचा निकाल १०० टक्के लागण्यासाठी सर्व विद्यार्थी निश्चित मेहनत घेतील ते आमचे दायित्व ठरलं आहे अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली. यावेळी प्रिंसिपल जाधव, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष दरबस्तेवार, माधव हळदेकर, पत्रकार गणेश कत्रूवार, मुकेश जोशी,जि प मुख्याध्यापक संदीप कमठाणे, संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार यांचीसुद्धा मार्गदर्शनपर भाषणे झाली. सर्वांनी अभ्यासाचे व्यवस्थित नियोजन करा, न घाबरता पेपर लिहा, आत्मविश्वास ठेवा, आपणास निश्चित यश मिळेल अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांकडून शाळेस ३० स्टडी खुर्ची भेट देण्यात आली.यावेळी शाळेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करते वेळी सांगितले कि, कॉफीचा अवलंब न करता उज्ज्वल यश मिळवण्यासाठी आवाहन केले आहे.चांगला निकाल लावून शाळेचे नाव उज्ज्वल करा, परीक्षेला वेळेत जा, उत्कृष्ठ पेपर लिहून चांगले गुण मिळवा, असे त्यांनी यावेळी सांगितले. हा निरोप समारंभ इयत्ता नववीच्या वर्गशिक्षक व वर्गाकडून देण्यात आला होता. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भास्कर यांनी केले, तर आभार सहशिक्षक दत्ता हमंद यांनी मानले. सदरील कार्यक्रमासाठी शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

# कुसुमाग्रज महावाचन अभियानांतर्गत वाचनालयाचे उद्घाटन

**अक्षराज : प्रमोद डफळ**



**दि.१६, राहुरी (अहिल्यानगर) :** वाचनसंस्कृतीचा प्रचार व प्रसार होऊन विद्यार्थ्यांमध्ये बालवयातच वाचनाची आवड निर्माण व्हावी, तसेच वाचनातून विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक व बौद्धिक विकास व्हावा या उद्देशाने तालुक्यातील चिंचोली येथील जिल्हा परिषद भटारकर वस्ती प्राथमिक शाळेत वाचनालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. हा उपक्रम कुसुमाग्रज महावाचन अभियानांतर्गत राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेत प्रभात फेरी, वृक्षदिंडी, बाल वाचनालय व शिक्षक वाचनालय अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रभात फेरीद्वारे वाचनाचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचवण्यात आले, तर वृक्ष दिंडीद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत वाचन संस्कृतीला चालना दिली. याच कार्यक्रमाच्या अनुषंगाने 'हिंद की चादर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त प्रबोधनात्मक व मूल्याधिष्ठित उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शौर्य, त्याग व देशप्रेमाचे महत्त्व यावेळी समजावून सांगण्यात आले.

पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण भोसले यांच्या हस्ते वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुरी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी म ोहनीराज तुंबारे होते, तर कोल्हार बीटच्या शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती. या वाचनालयासाठी हभप अशोक महाराज भोसले यांनी २ हजार ५०० रुपये किमतीची पुस्तके व शैक्षणिक साहित्य देणगी स्वरूपात दिले. या देणगीमुळे शाळेच्या वाचनालयाला मोठे बळ मिळाल्याचे मुख्याध्यापक रावसाहेब मगरे यांनी सांगितले.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय लाटे, उपाध्यक्ष विनोद चोखर, सामाजिक कार्यकर्ते विलास लाटे, सुधीर गागरे, यशवंत लाटे, वैभव जाधव, विद्यार्थी, पालकवर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रावसाहेब मगरे, अध्यापक मिलिंद अंत्रे, श्रीमती उज्वला वासाल, पठारे मॅडम, लखापती व मरभळ मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणारा व संस्कारक्षम वातावरण तयार करणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.